अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# शाळेतील धडे आणि जीवनाचे अर्थ

समाजातल्या जवळपास नव्वद टक्के लोकांच्या जीवनामध्ये शाळा हा एक अविभाज्य घटक असतो. अर्थात अजूनही दहा टक्के वर्ग असा आहे की, ज्यांना आपल्या परिस्थितीमुळे शाळेचे तोंडदेखील पाहता येत नाही. चांगले जीवन घडण्यासाठी शाळा ही अनिवार्य ठरते. आणि जीवनाचे काही धडे गिरवण्यासाठी शाळेतले जीवन जगणे तितकेच आवश्यक असते. जीवनासाठी शाळा आणि एकूण शाळेतले जीवन असा हा परस्पर संबंध जर तितक्याच अलगदपणे उलगडण्याचा प्रयत्न केला. तर तितक्याच रम्य आठवणी आणि तितक्याच गोड स्वप्नांचा पिसाराही सहजपणे उलगडला जातो. दरवर्षी जून महिन्यामध्ये शाळा उघडतात. महिना दीड महिना बंद असलेल्या शाळांचा परिसर मुलांच्या हालचालींनी गजबजून जातो. उन्हाळ्याच्या सुट्टीतली विश्रांती संपवून शाळा आणि शाळेतील मुलं पुन्हा एकदा आपापल्या कर्तव्यासाठी किंवा जबाबदारीसाठी रुजू होतात. पहिली ते दहावीपर्यंत प्रत्येकाला शाळेत हजेरी लावावीच लागते. अनेकजण आपल्या यशस्वी जीवनाचा पाया या शालेय जीवनामध्येच पक्का करीत असतात. किंबहुना एकूण जीवनाचे मूल्य समजावून घेण्याचा प्रयत्न करत असतात. शाळा म्हणजे केवळ पाठ्यपुस्तके नाहीत. पाटी-पेन्सील नाही. किंवा शिक्षकांनी शिकवले विद्यार्थ्यांनी ऐकले. अभ्यास केला परीक्षा दिली. दरवर्षी मुले पास होत गेली. असा सगळा एक प्रवास म्हणजे शाळा असा इतका त्याचा मर्यादित अर्थ नाही. शाळेत जातो. शाळेत शिकतो, परंतु तो केवळ एक परंपरागत शालेय अभ्यासक्रम नसतो. तर हे सगळे करत असताना आपण शाळेला किती समजावून घेतो, आपल्याला खूप काही शिकवणारी शाळा म्हणजे केवळ एक दगड मातीची सिमेंटची इमारत नसते.तर तिथल्या सगळ्या वातावरणातून आपण काही ना काही ग्रहण करीत असतो. ती इमारत ते वर्ग त्यातला फळा, बेंचेस या सगळ्या मुकवस्तू जरी असल्या तरी नकळतपणे त्या आपल्याशी बोलत असतात हे आपण समजून घेत नाही. आपल्या ते लक्षातही येत नाही. हे जाणून घेण्याचा आपण प्रयत्नही करीत नाही. परंतु त्याचा अनामिकपणे अनुभव येत असतो. अगदी समजा एखाद्या दिवशी तुमच्या नेहमीच्या बेंचवर दुसरा कोणी बसला असेल तर आपल्याला लागलीच चुकचुकल्यासारखे वाटते. आपल्या नेहमीच्या वर्गाऐवजी दुसऱ्या वर्गात जरी बसवले गेले तरीसुध्दा आपल्याला तो बदल लागलीच जाणवतो. एवढेच काय आपले आवडते शिक्षक किंवा वर्गशिक्षक जर दोन चार दिवस रजेवर राहिले तरी ते आपल्याला तितक्याच तीव्रपणे जाणवते.इतके आपण त्याच्याशी समरस झालेले असतो. शाळेतल्या साध्या वस्तूमधूनदेखील आपण एक संवाद साधत असतो आणि खूपकाही समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

### कल्पना आणि संकल्पना

म्हणूनच शाळा या प्रकाराकडे बघताना तितक्याच व्यापकपणे शाळेचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. शाळेत गिरवले जाणारे धडे जीवनाचा आकार देणारे असले तरीसुध्दा शाळा ही एक अधिक उदात्त संकल्पना आहे. आणि तिच्यातून खूप काही नवे अर्थ गवसत असतात. अगदी बालवाडी किंवा पहिलीच्या वर्गात पालकवर्ग आपल्या मुलांना मोठ्या उत्साहाने शाळेच्या त्या दारापर्यंत घेऊन येतात. पहिल्या दिवशी शाळेच्या आवारात असणारे हे दृश्य मोठे गंमतीदार असते. शाळा नको म्हणून भोकाड पसरून रडणारी मुले किंवा अधिक उत्साहाने गणवेश, दप्तर, वॉटर बॉटल घेऊन इमारतीकडे धावणारी मुले पाहिल्यानंतर कंटाळवाणा वाटणारा हा प्रकार हळूहळू इतका सवयीचा होतो की, मुलांना आता आपली शाळेपासून सुटका नाही याची जाणीव व्हायला लागते. मोठमोठे साहित्यिक लेखक मंडळी किंवा तत्त्वविचार सांगणारे जीवन हीच एक मोठी शाळा आहे अशा प्रकारचे वाक्य आपल्याला ऐकवतात. परंतु या सगळ्यांच्या जीवनाला शाळाच आकार देते हेही तितकेच खरे आहे. म्हणूनच शाळा ही एक केवळ इमारत नाही, एक दगडाची वास्तू नाही तर ती एकूणच व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाची व्यापक संकल्पना आहे. शालेय अभ्यासक्रमाच्या व्यतिरिक्त किंवा करियरच्या पलिकडे जाऊन शाळा या घटकाकडे पाहण्याचीदेखील शिकवण मिळाली पाहिजे. जी कदाचित शाळेतून मिळणार नाही. शाळेच्या बाहेर राहून पालकांकडून किंवा प्रत्येकाला स्वत:मधूनच ती आत्मसात करावी लागेल. वर्षानुवर्षे केवळ पाठ्यपुस्तकांशी आपण शाळा ही निगडित ठेवली आहे आपल्या मुलाचे भवितव्य चांगले घडावे, त्याला नोकरी मिळावी त्यासाठी प्रत्येक पालक नावलौकिक असलेली किंवा अधिक चांगला दर्जा असलेली शाळा मिळवण्याचा प्रयत्न करतो. परंतु अगदी म्युनिसिपालटीच्या शाळेतूनही अनेक चांगले धडे गिरवता येतात आणि या शाळांमधूनही मोठमोठी व्यक्तिमत्त्वेसुध्दा समाजाला मिळाली आहेत. म्हणूनच या घटकाकडे बघताना प्रत्येकानेच आपल्या जाणीवा संवेदनाक्षम ठेवल्या पाहिजेत. अभ्यासक्रमासाठी केवळ शाळा नाही किंवा व्यवसाय धंद्यासाठी शाळा नाही. ही गोष्टदेखील मनात बिंबवली पाहिजे. रोज शाळेत पोहचवायला जाणारा पालकवर्गानेदेखील मागे वळून पाहिले पाहिजे. अशाच कुठल्या तरी शाळेतून आपण लहानाचे मोठे झालो जे आपल्याला मिळवता आले नाही. ती किंवा शाळेकडे पाहताना जी दृष्टी आपण ठेवली नाही ती आपण आपल्या मुलांमध्ये निर्माण करू शकू का, असा प्रयत्न केला पाहिजे.

### समृध्दीचा चुकीचा अर्थ

दुर्दैवाने आजच्या या सगळ्या व्यापार युगामध्ये शिक्षण किंवा शाळा याला व्यवसायाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.चांगल्या करियरसाठी भरपूर फी मोजायची तयारी पालकवर्ग ठेवतो तर संस्थाचालकही असा पैसा कमावण्यासाठी शाळांची दुकानदारी करताना दिसतात. प्राचीन काळापासून शिक्षणाला व्रत मानले गेले. समृध्द जीवन जगण्यासाठी जे जे ज्ञान आवश्यक असते. ते मिळवण्याचा प्रयत्न शाळेतून करावयाचा असतो. परंतु अलिकडे समृध्द या शब्दाचा अर्थ बदलला आहे. पैसा, संपत्ती अशी समृध्दीची व्याख्या केली जाते. परंतु भरपूर ज्ञान मिळवणे. त्या ज्ञानाचा आपल्या व्यक्तिगत जीवनासाठी आणि समाजासाठी उपयोग करणे जगण्याचे समाधान प्राप्त करणे ही खरीसमृध्दी असते. ती जाणीव नाहीशी होत असल्यामुळे शाळेकडे पाहण्याचा विद्यार्थ्यांचा, पालकांचा, शिक्षकांचा, शासनाचा. एवढेच नव्हे तर संस्थाचालकांचा दृष्टिकोन बदलतो आहे.व्यापार आणि पैसा अशा दुष्टचक्रामध्ये शिक्षण किंवा शाळा हे घटक सापडल्याचे दिसून येते. यासाठी नव्याने त्या प्रकाराचा अर्थ समजावून घेण्याची जबाबदारी समाजातल्या बुद्धिवंतांवर आहे.